# प्रशासक कालावधीत रायगड जिल्हा परिषद, अलिबाग सर्वसाधारण सभा गुरूवारी दि.१३/०२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात घेण्यात आली, त्या सभेचे इतिवृत्त

**भाग -1**

| अ.क्र | उपस्थितअधिकारी |
|---|---|
| १. | मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प, अलिबाग |
| २. | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प., अलिबाग |
| ३. | प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यंत्रणा, रायगड-अलिबाग |
| ४. | सचिव प्रशासकीय सर्वसाधारण सभा तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र),रा.जि.प अलिबाग |
| ५. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, रा.जि.प अलिबाग |
| ६. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं)रा.जि.प अलिबाग |
| ७. | कार्यकारी अभियंता (बांधकाम) रा.जि.प अलिबाग |
| ८. | कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) रा.जि.प अलिबाग |
| ९. | जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बालकल्याण, रा.जि.प, अलिबाग |
| १०. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पाणी व स्वच्छता विभाग) रा.जि.प अलिबाग |
| ११. | कृषी विकास अधिकारी, रा.जि.प अलिबाग |
| १२. | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, रा.जि.प, अलिबाग |
| १३. | जिल्हा आरोग्य अधिकारी, रा.जि.प अलिबाग |
| १४. | समाजकल्याण अधिकारी,रा.जि.प अलिबाग |
| १५. | शिक्षणाधिकारी(प्राथ)रा.जि.प अलिबाग |
| १६. | शिक्षणाधिकारी(माध्य)रा.जि.प अलिबाग |

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद यांचे सभागृहात आगमन होताच वंदे मातरम या राष्ट्रगीता नंतर सभेची सुरूवात करण्यात आली.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद, अलिबाग म्हणाले की, आज गुरूवार दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित केलेल्या सर्वसाधारण नियमित सभेस सभागृहात उपस्थित असलेले सर्व खातेप्रमुख, इतर विभागाचे अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग यांचे मन:पूर्वक स्वागत करतो.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभेचे सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी(सा.प्र.) यांना विषयपत्रिकेनुसार सभेच्या कामकाजास सुरुवात करणेबाबत सांगितले.

**विषय क्रमांक ०१ :- जिल्हा परिषद सेस व जिल्हा नियोजन समिती मार्फत मंजूर योजनांच्या प्रगतीचा व खर्चाचा आढावा.**

सहाय्यक लेखाधिकारी (अर्थ विभाग, राजिप,अलिबाग) यांनी माहे जानेवारी २०२५ अखेरचा जिल्हा परिषद सेस व जिल्हा नियोजन समिती मार्फत मंजूर योजनांच्या प्रगतीचा व खर्चाचा आढावा अहवाल वाचन केले.

**विषय क्रमांक ०२ :- दि.०२/०१/२०२५ रोजीच्या प्रशासकीय सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.**

सचिव प्रशासकीय सर्वसाधारण सभा तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र), म्हणाले की, दि.०२/०१/२०२५ रोजी घेण्यात आलेल्या नियमित सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास आजच्या सभेने मान्यता द्यावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाले की, दि.०२/०१/२०२५ रोजी घेण्यात आलेल्या नियमित सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- सामान्य प्रशासन विभाग**

**विषय क्रमांक ०३ :- विभाग निहाय आढावा**

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाले की, राज्य शासनाच्या प्रशासनिक विभागांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. त्यामधील संकेतस्थळ, सुकर जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे नियोजन, कार्यालयातील सोयी व सुविधा, क्षेत्रीय भेटी याबाबत केलेला नियोजनाचा आढावा थोडक्यात सर्व विभागांनी द्यावा.

**बांधकाम विभाग :-** कार्यकारी अभियंता(बांधकाम) यांनी बांधकाम विभागाचा आढावा दिला.

**ग्रामिण पाणी पुरवठा विभाग :-** कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) यांनी ग्रामिण पाणी पुरवठा विभागाचा आढावा दिला.

**ग्रामपंचायत विभाग :-** उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.) हे ग्रामपंचायत विभागाचा आढावा देताना म्हणाले की, जनतेच्या सुकर जीवनमानासाठी आपण प्रत्येक ग्रामपंचायतींमध्ये माहितीचे पोस्टर्स लावणार आहोत. तसेच सर्व ग्रामपंचायतीमधील नागरिकांचे व्हॉट्स ॲपचे ग्रुप बनविले आहेत जेणेकरून सर्व योजनांची माहिती तात्काळ नागरिकांना या ग्रुपच्या माध्यमातून देता येईल. नागरिकांना लागणाऱ्या विविध प्रकारच्या दाखल्यांसाठी आम्ही कॅम्प लावण्याचे नियोजन केलेले आहे. क्यू आर कोड तयार करणे, आदिवासी बांधवांना ग्रामपंचायतमार्फत मोफत सेवा देणे असे वेगवेगळे उपक्रम राबवणार आहोत.

**आरोग्य विभाग :-** जिल्हा आरोग्य अधिकारी या आरोग्य विभागाचा आढावा देताना म्हणाल्या की, एखाद्या नागरीकास छोटा व्यवसाय करावयाचा असल्यास त्यासाठी अन्न परवाना लागतो तर आम्ही वृत्तपत्रात बातमी देवून जास्तीत जास्त लोकांना नविन अन्न परवाने किंवा परवाना नुतनीकरण करण्यासाठी प्रेरित करून लवकरात लवकर परवाने कसे दिले जातील यासाठी प्रयत्न करणार आहोत.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाले की, यासंदर्भात ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा करण्यात यावी व अर्जाचा नमुना तयार करून आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावा. तसेच जवळ असणाऱ्या प्रा.आ.केंद्रामार्फत ऑफलाईन अर्ज स्विकारून घ्यावीत व अर्जदारास १० दिवसांच्या आत अन्न

परवाना दिला जाईल याची दक्षता घ्यावी. तसेच बचत गटांना अन्न परवान्याची आवश्यकता असतील अशा बचतगटांकडून अर्ज मागवून त्यांना त्वरीत अन्न परवाने देण्यात यावेत.

खाजगी दवाखान्यांची नोंदणी त्वरीत करून बोगस डॉक्टर्सची संशोधन मोहिम घेण्यात यावी. जे बोगस डॉक्टर्स असतील त्यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करावेत.

**महिला व बालकल्याण विभाग :-** जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बालकल्याण, रा.जि.प, अलिबाग यांनी महिला व बालकल्याण विभागाचा आढावा दिला.

**शिक्षण विभाग (प्राथमिक) :-** शिक्षणाधिकारी (प्राथ.) या विभागाचा आढावा देताना म्हणाल्या की, आपल्या विभागामार्फत आरटीई प्रमाणपत्र देण्यात येतात.

अनधिकृत शाळा:- यामध्ये मुलांची फसवणूक होऊ नये म्हणून अनधिकृत शाळांची वर्तमानपत्रात प्रसिद्धी देण्यात आली आहे. यावर

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाले की, ज्या अनधिकृत शाळा आहेत त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत. तसेच कर्मचाऱ्यांची पेंशन, फंड, गटविमा याची प्रलंबित प्रकरणे १५ मार्च च्या अगोदर निकाली काढावीत.

**शिक्षण विभाग (माध्यमिक) :-** मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना खालील सूचना केल्या.

१) अनधिकृत शाळांवर कारवाई करावी.
२) सर्व खाजगी शाळेतील शिक्षक/कर्मचाऱ्यांच्या समस्या जसे की, पेंशन, फंड, गटविमा व अनुकंपा प्रलंबित प्रकरणे याची माहिती घेवून ते प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावीत.
३) प्रेस नोट करावी.

**समाजकल्याण विभाग :-** जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समाजकल्याण विभागाचा आढावा दिला.

**पशुसंवर्धन विभाग :-** जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी पशुसंवर्धन विभागाचा आढावा देताना म्हणाले की, तालुकानिहाय कॅम्प घेणे चालू आहे.

**कृषि विभाग :-** जिल्हा कृषि विकास अधिकारी यांनी कृषि विभागाचा आढावा दिला.

**अर्थ विभाग :-** मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी अर्थ विभागाचा आढावा दिला.

**पाणी व स्वच्छता विभाग :-** उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांनी पाणी व स्वच्छता विभागाचा आढाव दिला.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व विभागांना सूचना देताना म्हणाले की,

१) दोन दिवसांत सर्व विभागांनी योजनांची अद्ययावत माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागात द्यावी.

२) सर्व विभागांनी आपले कार्यालय, कार्यालयीन सोयी-सुविधा, शौचालय गृह, रेकॉर्ड रूम्स व कार्यालय परिसराची स्वच्छता करून घेणे, कार्यालय परिसरात झाडे लावणे ही कामे करण्यापुर्वी व केल्यानंतर यांसंदर्भात फोटो काढण्यात यावेत.

३) सर्व विभागांनी अभिलेख वर्गीकरणाची कामे १५ दिवसांत पूर्ण करून घ्यावीत.

४)सर्व विभागांनी जि.प.अंतर्गत येणाऱ्या सर्व योजना १०० दिवसांच्या आत लाभार्थ्यांपर्यत पोहचविणे.

५)विविध प्रकारचे जे दाखले आहेत ते संबंधित कार्यालयांनी या कालावधीमध्ये गरज असणाऱ्या नागरिकांकडून अर्ज घेवून त्यानूसार कॅम्प घेवून त्या नागरिकांना सहज उपलब्ध करून द्यावीत.

६)सर्व विभागांनी आपले सरकार, पीजी पोर्टल वरील प्रकरणे प्रलंबित ठेवू नयेत ती त्वरीत निकाली काढण्याची कार्यवाही करावी.

**विषय (०४) :- मा.प्रशासक जि.प. यांचे अधिकारात येणाऱ्या प्रस्तांवाना मंजूरी देणे.**

**विषय (०४)०१ :- कांगोरी गडावर जाणारा साकव तयार करणे, ता.महाड, जि.रायगड**

कार्यकारी अभियंता (बांधकाम ) म्हणाले की, कांगोरी गडावर जाणारा साकव तयार करणे, ता.महाड, जि.रायगड या कामास प्रादेशिक पर्यटन विकास योजना या लेखाशिर्षातर्गत रक्कम रू.९०,००,०००/- प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे.

बांधकाम विभाग, रायगड जिल्हा परिषद अलिबाग कार्यालयाकडून दि.२०/०८/२०२४ अन्वये निविदा मागविल्या असता त्यामध्ये श्री.वैभव लक्ष्मण भोसले, मु.पो.महाड (प्रभात कॉलनी) ता.महाड जि.रायगड(अंदाजपत्रकीय दराने रक्कम रू.८९,९८,६३८/- ने प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे कलम ४(२) नुसार व शासन निर्णय दिनांक - ०८ ऑक्टोंबर २०२१ नुसार ७५ लक्ष वरिल कामाची निविदा मंजुरीचे अधिकार जिल्हा परिषद सर्व साधारण सभेस आहेत. परंतु जिल्हा परिषदेमध्ये प्रशासकीय कालावधी असल्याने सदरचे अधिकार महाराष्ट्र शासन राजपत्र ग्राम विकास विभाग दिनांक ११/०३/२०२२ अन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले असल्याने कांगोरी गडावर जाणारा साकाव तयार करणे ता.महाड जि.रायगड या कामाच्या निविदेस कमी दराने प्राप्त झलेल्या निविदाधारक श्री.वैभव लक्ष्मण भोसले, मु.पो.महाड (प्रभात कॉलनी), ता.महाड, जि.रायगड (अंदाजपत्रकीय दराने रक्कम रू.८९,९८,६३८/-) यांच्या निविदा प्रस्तावास आजच्या सभेने मान्यता दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून कांगोरी गडावर जाणारा साकव तयार करणे, ता.महाड, जि.रायगड प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- बांधकाम विभाग**

**विषय (०४)०२ :- ग्रामपंचायत नागांव कार्यालय बांधणेसाठी जागा देणेबाबत.**

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) म्हणाले की, गट विकास अधिकारी,पंचायत समिती उरण यांनी जा.क्र./पंसउ/ग्रापं.नागांव/५७०१/२०२४,दि.१०.१२.२०२४ चे पत्रान्वये ग्रामपंचायत कार्यालयास स्वत:ची इमारत नाही. परंतु इमारत बांधण्यासाठी ग्रामपंचायतीकडे पुरेसा निधी उपलब्ध आहे. ग्रामपंचायतीकडे स्वत:चे नावे जागा उपलब्ध नसल्याने ग्रामपंचायत नागांव हद्दीतील डि.लोकल बोर्ड शाळेच्या नावे असलेली **सर्व्हे नं.३७/०७,क्षेत्र ०.०६.०८** जमिनीवर ग्रामपंचायत कार्यालय बांधणेसाठी ग्रामपंचायतीने ठराव क्र.१९(२) दि.२७.११.२०२४ अन्वये ठराव घेऊन बांधण्यात येणा-या इमारतीचे देखभाल दुरुस्ती करण्यास ग्रामपंचायत तयार असल्याचे नमूद करुन ग्रामपंचायतीने जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव सादर करणेसाठी विनंती केली असल्याने .व सदर प्रस्तावासोबत सातबारा उतारा, गाव नमुना नं.६, ८ अ चा उतारा जोडला आहे. तसेच ग्रामसभा व मासिक सभा ठराव जोडलेला आहे.

**जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम १२८ मध्ये मालमत्ता संपादन करण्याच्या व ती भाडे पट्टयाने देण्याचा, विकण्याचा किंवा हस्तांतरित करण्याचा अधिकार.**

**१)जिल्हा परिषदेस, आपल्या कार्यापैकी कोणत्याही कार्याच्या प्रयोजनासाठी**

**(अ)स्थावर व जंगम अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन व धारण करता येईल, मग ती जिल्हयाच्या हद्दीतील असो किंवा हद्दीबाहेरील असो, किंवा**

(ब) तिच्यामध्ये निहीत असलेली, किंवा निहीत करता येईल अशी, किंवा ती संपादन करील अशी कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल, विकता येईल किंवा अन्यथा हस्तांतरित करता येईल.

**परंतु, अशा कोणत्यही मालमत्तांचे कोणतेही संपादन, भाडेपट्टा, विक्री किंवा अन्यथा हस्तंतरण हे, नियमाव्दारे विहीत करण्यात येईल अशा प्राधिका-यांच्या किंवा अधिका-याच्या पुर्वमंजूरीवाचून विधिग्राहय असणार नाही असे नमूद आहे.**

वरील नियमाचे अधिन राहुन उरण तालुक्यातील नागाव ग्रामपंचायत कार्यालयास स्वत:ची इमारत नसल्याने व इमारत बांधण्यासाठी ग्रामपंचायतीकडे पुरेसा निधी उपलब्ध असल्यामुळे ग्रामपंचायत नागांव हद्दीतील डि.लोकल बोर्ड शाळेच्या नावे असलेली सर्व्हे नं.३७/०७,क्षेत्र ०.०६.०८ जमिनीपैकी ०.०२.६ एवढे क्षेत्र ग्रामपंचायत कार्यालय बांधणेसाठी ग्रामपंचायतीने ग्रामसभा ठराव क्र.९(२),दि.२७.११.२०२४ व मासिक सभा ठराव क्र.१९(२) दि.२७.११.२०२४ अन्वये घेतलेल्या ठरावानुसार ग्रामपंचायत कार्यालय बांधण्यात येणा-या इमारतीचे देखभाल दुरुस्ती करण्यास ग्रामपंचायत तयार असल्याचे अटिचे अधिन राहुन.सदर प्रस्तावास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत ठराव घेणे आवश्यक आहे.

परंतु प्रत्यक्षात महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्ये उप-विभाग दिनांक ११ मार्च २०२२ नुसार जिल्हा परिषदेचा कार्यकाल दि.२०.०३.२०२२ रोजी संपुष्ठात आल्याने दि.२१.०३.२०२२ पासून प्रशासक म्हणून मा.मुख्य कार्यकारी अधिकारी असल्याने व सदर प्रशासकीय कालावधीस महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्ये उप-विभाग दिनांक १३ सप्टेंबर २०२२ अन्वये मुदतवाढ देण्यात आल्यामुळे प्रशासक म्हणुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधि नियम १९६१ चे कलम १२८ नुसार सक्षम प्राधिकारी यांची मंजुरी घेणेचे अधिन राहुन ग्रामपंचायत नागाव ता.उरण येथील जिल्हा परिषद मालकीची सर्व्हे नं.३७/०७, क्षेत्र ०.०६.०८ जमिनीपैकी २ गुंठे एवढे क्षेत्र ग्रामपंचायत नागाव कार्यालय बांधकाम करणे या प्रयोजनासाठी ग्रामपंचायतीचे ग्रामसभा व मासिक सभेच्या ठरावाच्या अधिन राहुन प्रशासकीय मंजूरी आदेशासह शिफारस करीत आहे.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ग्रामपंचायत नागाव कार्यालय बांधकाम करणे या प्रयोजनासाठी ग्रामपंचायतीचे ग्रामसभा व मासिक सभेच्या ठरावाच्या अधिन राहुन प्रशासकीय मंजूरी आदेशासह शिफारस करण्याच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- ग्रामपंचायत विभाग**

**विषय (०४)०३ :-** जिल्हा सर्वसाधारण समितीकडील जिल्हा परिषद सेस सन २०२४-२५ चे तरतुदीचे पुनर्विनियोजन करुन सुधारित तरतुदीच्या खर्चास मंजुरी देणेबाबत

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी म्हणाले की, ग्रामविकास विभागाकडील शासननिर्णय क्र/झेडपीए-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९, दिनांक ०७.१०.२०१७ चे भाग-२ अन्वये न्यूनतम रक्कम रु.५०,००,००१/- च्या वरील अधिकतम मर्यादा च्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा सर्वसाधारण समिती सभेस आहेत.

ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र, असाधरण भाग-१-अ, उपविभाग, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई, दिनांक ११.०३.२०२२ व दिनांक १३.०९.२०२२ अन्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासक म्हणून अधिकार प्रदान केलेले आहे.

त्यानुसार पशुसंवर्धन विभागाकडील खाली नमुद तक्तयातील सन २०२४-२५ चे जिल्हा परिषेद सेस अंतर्गत न्यूनतम रक्कम रु. ५०,००,००१/- च्या वरील अधिकतम मर्यादा च्या योजनांना प्रशासकीय

मान्यता मिळणेकरीता पशुसंवर्धन विभागाकडील सन २०२४-२५ च्या तरतुदीचे पुनर्विनियोजन करुन जिल्हा परिषद सेस अंतर्गत रक्कम रु ९०.५५ लक्ष यांस जिल्हा सर्वसाधारण सभेने मान्यता दयावी.

पशुसंवर्धन विभाग रायगड जिल्हा परिषद, अलिबाग, सन २०२४-२५ चा पुर्नविनियोजनाचे अंतिम अर्थसंकल्पीय विवरण पत्र

| अ | जिल्हा परिषद सेस (योजोचे - नाव) | संगणक कोड | सन २०२४-२५ चे मुळ अर्थसंकल्पातील तरतूद | सन २०२४-२५ मध्ये वाढीव तरतूद | सन २०२४-२५ एकुण तरतुद (४+५) | सन २०२४-२५ चे पुर्नविनियोजनाची वाढ (+) कमी (-) तरतूद | सा २०२४-२५ मध्ये सुधारीत वाढीव तरतूद ((+) वाढ ) | सन २०२४-२५ मध्ये सुधारित कमी केलेली तरतूद ((-)कमी) | सन २०२४-२५ चे अर्थसकल्पातील अंतिम सुधारित तरतूद ((६+८)-९) | तरतुदीमध्ये वाढ/ घट केल्याबाबत सविस्तर कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | पशुवैदयकीय दवाखाने दुरूस्ती व देखभाल | १२३१ | १००००००० | ० | १००००००० | ० | ० | ० | १००००००० | - |
| २ | औषधे, लसी व उपकरणे खरेदी | १२३२ | ४५००००० | ४७५००००० | ९२५०००० | (+)१२,५०,०००/-<br>(+)१२४९- १०,६०,०००/-<br>(+)१२६५- १,९०,०००/-<br>(+)१२४३- १२,५०,०००/- | २५००००० | ० | ११७५०००० | औषधे पुरवठा करिता. |
| ३ | योजना राबविणेसाठी सादील | १२४२ | ६००००० | ० | ६००००० | (+)२,५०,०००/-<br>(+)१२६५- २,५०,०००/- | २५०००० | ० | ८५०००० | सादिल देय अदाय करिता |
| ४ | नैसर्गिक व आपल्कालीन परिस्थिमध्ये पशूपालकांना तात्काळ अर्थसहाय्य | १२४९ | १५००००० | ० | १५००००० | (-)१०,६०,०००/-<br>(-)१२३२- १०,६०,०००/- | ० | १०६०००० | ४४०००० | ८८ लाभार्थी रीता आवश्य तरतूद. |
| ५ | योजनांच्या प्रसिदिध व प्रचारासाटी होणारा खर्च | १२५६ | १०००००० | ० | १०००००० | (-)९,९९,०००/-<br>(-)१२५६- ९,९९,०००/- | ० | ९९९००० | १००० | - |
| ६ | खनिजद्रव्य मिश्रण, फिड सप्लिमट व जीवनसत्वांचा पुरवठा | १२५७ | ३५००००० | ४२५०००० | ७७५००००० | (+)४३,०५,०००/-<br>१२६५ (+) रू.५९,०००/-<br>१२४३ (+) रू.३७,४९,०००/-<br>१२६६ (+) रू.४,९७,०००/- | ४३०५००० | ० | १२०५५००० | औषधे पुरवठा करिता. |
| ७ | पुशवैदयकीय दवाखांन्याची विदयुत, दुरध्वनी व भाडे देयके अदा करणे. | १२६१ | १२००००० | ० | १२००००० | ० | ० | ० | १२००००० | - |
| ८ | पशुसंवर्धन विभाग व अधिनस्त कार्यालये दवाखान्यांची आधुनिकिकरण व बळकटभ्करण अंतर्गत साहित्य उपकरणे, आजारे व इतर खरेदी | १२६२ | २५००००० | ४०७१००० | ६५७१००० | (+)२०,००,०००/-<br>१२५६ (+) रू.९,९९,०००/-<br>१२६७ (+) रू.९,९९,०००/-<br>१२६६ (+) रू.२,०००/- | २०००००० | ० | ८५७१००० | तालुका स्तर ावरील पशुवैदयकीय दवाखाने बळकंटीकरण अंतर्गत साहित्य खरेदि करीता आवश्यक |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | एक दिवसीय पिल्ले वाढविण्यासाठी इलेक्ट्रीक बुडर पुरवठा करणे | १२६४ | १००० | ० | १००० | ० | ० | ० | १००० | - |
| १० | दुध उत्पादनासाठी मुरघास पुरवठा करणे | १२६५ | ५००००० | ० | ५००००० | (-)४,९९,०००/-<br>(-)१२३२- १,९०,०००/-<br>(-)१२४२- २,५०,०००/-<br>(-)१२५७- ५९,०००/- | ० | ४९९००० | १००० | - |
| ११ | हिरवा चारा उत्पादनासाठी हायड्रोफोनिक यंत्राचा पुरवठा करणे. | १२६६ | ५००००० | ० | ५००००० | (-)४,९९,०००/-<br>(-)१२५७- ४,९७,०००/-<br>(-)१२६२- २,०००/- | ० | ४९९००० | १००० | - |
| १२ | जिल्हास्तरीय पशूधन प्रदर्शन व पशुमंळावे भरविणे | १२६७ | १०००००० | ० | १०००००० | (-)९,९९,०००/-<br>(-)१२६२- ९,९९,०००/- | ० | ९९९००० | १००० | - |
| १३ | कुत्रयांचे निर्बिजीकरण तसेच लसीकरण करणे | १२४३ | ५०००००० | ० | ५०००००० | (-)४९,९९,०००/-<br>(-)१२५७- ३७,४९,०००/-<br>(-)१२३२- १२,५०,०००/- | ० | ४९९९००० | १००० | कुत्रयांचे निर्बिजीकरण तसेच लसीकरण आवश्यक |
| १४ | पशूवैदयकीय दवाखन्यांना छापील रजिस्टर व फार्म व केस पेपर पुरविणे. | १२३५ | ७००००० | ० | ७००००० | ० | ० | ० | ७००००० | - |
| | एकुण | | ३२५०१००० | १३०७१००० | ४५५७२००० | | ९०५५००० | ९०५५००० | ४५५७२००० | |

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून जिल्हा सर्वसाधारण सभेकडील (जिल्हा परिषद सेस सन २०२४-२५ चे तरतुदीचे पुर्नविनियोजन करून सुधारित तरतुदिच्या खर्चास मंजुरी देणेच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- पशुसंवर्धन विभाग**

**विषय (०४)०४ :- सन २०२४-२५ या वित्तीय वर्षातील पुर्नविनियोजनाद्वारे जि.प.सेस सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

जिल्हा कृषी अधिकारी म्हणाले की, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम मधील कलम१३८ प्रमाणे पुर्नविनियोजनाने सु धारीत तरतूद करणेसाठी जिल्हा परिषद सभेची मंजूरी मिळणे आवश्यक आहे. तथापी यासंदर्भात शासनाच्या ग्राम विकास विभागाकडील दिनांक ११.मार्च २०२२ रोजीच्या आदेश व अधिसुचनेनुसार २५ जिल्हा परिषदांच्या कार्यकाळ दिनांक २० मार्च २०२२ रोजी कार्यकाळ संपुष्टात आला आहे. आणि उक्त जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समित्यांचे सभापती पदे एकाच वेळी रिक्त होत आहेत.तसेच राज्य निवडणुका विहीत कालमर्यादेत घेणे शक्य नाही आणि राज्य शासनास विनंती केली आहे की जिल्हा परिषद व पंचयत समित्यांवर प्रशासकाची नियुक्ती करावी असे नमुद आहे.

त्यानुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ (सन १९६२ च्या ५) मधील कलम ९१ ब व ७५ ब या कलमान्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन उक्त जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषदांच्या सर्व अधिकाराचा वापर करण्यासाठी व त्यांची सर्व कर्तव्य पार पाडण्यासाठी दिनांक २०

मार्च २०२२ पासून पुढील चार महिन्यापर्यंत किंवा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष/उपाध्यक्ष आणि विषय समित्यांचे सभापती यांची पदे निवडणुकीद्वारे भरले जातील यापैकी जे आगोदर घडेल तोपर्यंत प्राधिकृत केले आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे योजनेचे कमी/अधिक अनुदानाचे पुनर्विनियोजन करण्यात येत आहे.

**सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद सेस अंतर्गत सुधारीत अंदाजपत्रक**

| अ क्र | संगणक सांकेतांक | बाब | सन २०२४-२५ मुळ अर्थसंकल्पातील तरतूद | सुधारीत अर्थसंकल्प कमी/अधिक (+/-) | एकुण सुधारीत पुरवणी अर्थसंकल्प | पुनर्विनियोजनाने प्रस्तावीत कमी/ अधिक (+/-) | एकुण सुधारीत पुनर्विनियोजना सहित अर्थसंकल्प |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ११२१ | तिनविरा येथे नर्सरी कलमे रोपे तयार करणेसाठी व साहित्य व मजूरीचा खर्च | १२२४००० | ० | १२२४००० | (-)१२२३००० | १००० |
| २ | ११३० | जिल्हास्तरीय कृषि मेळावा व प्रदर्शन | ५००००० | ० | ५००००० | (-)४९९००० | १००० |
| ३ | ११३१ | बायोगॅस पुरक अनुदान | १५००००० | ० | १५००००० | (-)१०००००० | ५००००० |
| ४ | ११५६ | ७५% अनुदानाने ताडपत्री पुरवठा करणे | ३५००००० | ० | ३५००००० | (+)८००००० | ४३००००० |
| ५ | ११६७ | ७५ टक्के अनुदानाने सिंचन साहित्य PVC पाईप्स/ HDPE पाईप्स/तुषार सिंचन संच इत्यादी साहित्य पुरवठा करणे. | १५००००० | ० | १५००००० | (+) २२१००० | १७२१००० |
| ६ | ११७३ | शेती विषयक सुधारीत अवजारे ७५% अनुदानाने पुरविणे | ३०००००० | ३०००००० | ६०००००० | (+)१२००००० | ७२००००० |
| ७ | ११८६ | शेतातील पिकांचे संरक्षणासाठी काटेरी तारेचे कुपणासाठी अनुदान देणे | २५००००० | २५००००० | ४०००००० | (+) १५००००० | ५५००००० |
| ८ | ११८७ | शेतक-यांना १००% अनुदानाने औषधी / पौष्टीक रोपांचे वाटप करणे | १०००००० | ० | १०००००० | (-)९९९००० | १००० |
| | | एकुण | १४७२४००० | ४५००००० | **१९२२४०००** | ० | **१९२२४०००** |

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून सन २०२४-२५ या वित्तीय वर्षातील पुनर्विनियोजनाद्वारे जि.प.सेस सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- कृषी विभाग**

**विषय (०४)०५ :- माथेरानच्या (जिल्हा रायगड) पायथ्याशी असलेले नेरळ मध्ये विविध ठिकाणी सौर लाईट बसविणे ता.कर्जत.**

कार्यकारी अभियंता (बांधकाम) म्हणाले की, माथेरानच्या (जिल्हा रायगड ) पायथ्याशी असलेले नेरळ मध्ये विविध ठिकाणी सौर लाईट बसविणे. ता.कर्जत या कामास प्रादेशिक पर्यटन विकास कार्यक्रम या लेखाशिर्षातर्गत शासन निर्णय क्रमांक टिडीयम २०२२/०६/प्र.क्र.३९२/ पर्यटन दि.२२/०६/२०२२ अन्वये रक्कम रू.१,५०,००,०००/- प्रशासकीय मंजुरी देणेत आलेली आहे.

बांधकाम विभाग, रायगड जिल्हा परिषद अलिबाग कार्यालयाकडून दिनांक-१०,१२,२०२४ अन्वये निविदा मागविल्या असता त्यामध्ये गौरव इलेक्ट्रिकल्स इंजिनिअर्स (भागीदार श्री.गौरव राजेंद्र पतंगे व श्री.राजेंद्र सदाशिव पतंगे) मु.शिवनगर अपार्टमेंट कोतवाल नगर ता.कर्जत (०.००१% कमी दराने रक्कम रू.१,४३,०२,३५७/-) ने प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे कलम ४(२) नुसार व शासन निर्णय दिनांक -०८ ऑक्टोबर २०२१ नुसार ७५ लेक्ष वरिल निविदा मंजुरीचे अधिकार जिल्हा परिषद सभा यांना आहेत. परंतू दिनांक -२०/०३/२०२२ रोजी जिल्हा परिषदेचा कार्यकाल संपल्याने महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ११/०३/२०२२ व महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचेकडील क्र.झेपीए-२०२२/प्र.क्र.२५/पंरा-१/दिनांक-१४/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषदवर प्रशासक नियुक्ती करण्यात आल्याने ७५ लक्ष वरिल निविदा मंजुरीचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असल्याने माथेरानच्या (जिल्हा रायगड) पायथ्याशी असलेले नेरळ मध्ये विविध ठिकाणी सौर लाईट बसविणे. ता.कर्जत या कामाच्या निविदेस कमी दराने प्राप्त झालेल्या निविदाधारक गौरव इलेक्ट्रिक्स इंजिनिअर्स (भागीदार श्री.गौरव राजेंद्र पतंगे व श्री.राजेंद्र सदाशिव पतंगे) मु.शिवनगर अपार्टमेट कोतवाल नगर ता.कर्जत यांच्या निविदेस आजच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून माथेरानच्या (जिल्हा रायगड) पायथ्याशी असलेले नेरळ मध्ये विविध ठिकाणी सौर लाईट बसविणे ता.कर्जतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- बांधकाम विभाग**

**विषय (०४)०६ :- माथेरानच्या (जिल्हा रायगड) पायथ्याशी असलेल्या कर्जत कल्याण हायवे लगत असलेल्या हिंदु हदय सम्राट बाळासाहेब ठाकरे चौक सुशोभिकरण करणे ता.कर्जत**

कार्यकारी अभियंता (बांधकाम) म्हणाले की, माथेरानच्या (जिल्हा रायगड ) पायथ्याशी असलेल्या कर्जत कल्याण हायवे लगत असलेल्या हिंदु हदय सम्राट बाळासाहेब ठाकरे चौक सुशोभिकरण करणे. ता.कर्जत या कामास प्रादेशिक पर्यटन विकास कार्यक्रम या लेखाशिर्षातर्गत शासन निर्णय क्रमांक टिडीयम २०२२/०६/प्र.क्र.३९२/ पर्यटन दि.२२/०६/२०२२ अन्वये रक्कम रू.२,००,००,०००/- प्रशासकीय मंजुरी देणेत आलेली आहे.

बांधकाम विभाग, रायगड जिल्हा परिषद अलिबाग कार्यालयाकडून दिनांक- ०९/१०/२०२४ अन्वये निविदा मागविल्या असता त्यामध्ये रोहित रविंद्र पाटील मु.शेखांचे गांव पो.नारंगी ता.अलिबाग (०.०७% कमी दराने रक्कम रू.१,९९,१८,५४१/-) ने प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे कलम ४(२) नुसार व शासन निर्णय दिनांक -०८ ऑक्टोबर २०२१ नुसार ७५ लेक्ष वरिल निविदा मंजुरीचे अधिकार जिल्हा परिषद सभा यांना आहेत. परंतू दिनांक -२०/०३/२०२२ रोजी जिल्हा परिषदेचा कार्यकाल संपल्याने महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ११/०३/२०२२ व महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचेकडील क्र.झेपीए-२०२२/प्र.क्र.२५/पंरा-१/दिनांक-१४/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषदवर प्रशासक नियुक्ती करण्यात आल्याने ७५ लक्ष वरिल निविदा मंजुरीचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असल्याने माथेरानच्या (जिल्हा रायगड) पायथ्याशी असलेल्या कर्जत कल्याण हायवे लगत असलेल्या हिंदू हदय सम्राट बाळासाहेब ठाकरे चौक सुशोभिकरण करणे. ता.कर्जत या कामाच्या निविदेस कमी दराने प्राप्त झालेल्या निविदाधारक रोहित रविंद्र पाटील. मु.शेखांचे गांव पो.नारंगी ता.अलिबाग यांच्या निविदेस आजच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून माथेरानच्या (जिल्हा रायगड) पायथ्याशी असलेल्या कर्जत कल्याण हायवे लगत असलेल्या हिंदु हदय सम्राट बाळासाहेब ठाकरे चौक सुशोभिकरण करणे ता.कर्जतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- बांधकाम विभाग**

**विषय (०४)०७ :- माथेरानच्या (जिल्हा रायगड) मधील वाकस गावातील स्वयंभु गणपती मंदिर परिसरात सुशोभिकरण करणे व सभामंडप बांधणे. ता.कर्जत**

कार्यकारी अभियंता (बांधकाम) म्हणाले की, कर्जत (जिल्हा रायगड ) मधील वाकस गावातील स्वयंभु गणपती मंदिर परिसरात सुशोभिकरण करणे व सभामंडप बांधणे. ता.कर्जत या कामास प्रादेशिक पर्यटन विकास कार्यक्रम या लेखाशिर्षातर्गत शासन निर्णय क्रमांक टिडीयम २०२२/०६/प्र.क्र.३९२/ पर्यटन दि.२२/०६/२०२२ अन्वये रक्कम रू.१,००,००,०००/- प्रशासकीय मंजुरी देणेत आलेली आहे.

बांधकाम विभाग, रायगड जिल्हा परिषद अलिबाग कार्यालयाकडून दिनांक- ०९/१०/२०२४ अन्वये निविदा मागविल्या असता त्यामध्ये ओम कंन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपर्स (प्रो.प्रा.श्री.प्रमोद परशुराम खडे) मु.गुढवण पो.सुगवे ता.कर्जत (०.९९% कमी दराने रक्कम रू.९९,००,६६५/-) ने प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे कलम ४(२) नुसार व शासन निर्णय दिनांक -०८ ऑक्टोबर २०२१ नुसार ७५ लेक्ष वरिल निविदा मंजुरीचे अधिकार जिल्हा परिषद सभा यांना आहेत. परंतू दिनांक -२०/०३/२०२२ रोजी जिल्हा परिषदेचा कार्यकाल संपल्याने महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ११/०३/२०२२ व महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचेकडील क्र.झेपीए-२०२२/प्र.क्र.२५/पंरा-१/दिनांक-१४/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषदवर प्रशासक नियुक्ती करण्यात आल्याने ७५ लक्ष वरिल निविदा मंजुरीचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असल्याने कर्जत (जिल्हा रायगड) मधील वाकस गावातील स्वयंभु गणपती मंदिर परिसरात सुशोभिकरण करणे व सभामंडप बांधणे. ता.कर्जत या कामाच्या निविदेस कमी दराने प्राप्त झालेल्या निविदाधारक ओम कंन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपर्स (प्रो.प्रा.श्री.प्रमोद परशुराम खडे) मु.गुढवण पो.सुगवे ता.कर्जत यांच्या निविदेस आजच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून माथेरानच्या (जिल्हा रायगड) मधील वाकस गावातील स्वयंभु गणपती मंदिर परिसरात सुशोभिकरण करणे व सभामंडप बांधणे. ता.कर्जतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- बांधकाम विभाग**

**विषय (०४)०८ :- प्रा.आ.उपकेंद्र रासळ ता.सुधागड मुख्य इमारत बांधकाम करणे.**

कार्यकारी अभियंता (बांधकाम) म्हणाले की, प्रा.आ.उपकेंद्र रासळ ता.सुधागड मुख्य इमारत बांधकाम करणे. या कामास प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे या लेखाशिर्षातर्गत जा.क्र.राजिप/आरोग्य/विस्तार-१/७९४/२०२३ दि.०३.०२.२०२३ अन्वये रक्कम रू.१,५०,००,०००/- प्रशासकीय मंजुरी देणेत आलेली आहे.

बांधकाम विभाग, रायगड जिल्हा परिषद अलिबाग कार्यालयाकडून दिनांक- २७/०९/२०२४ अन्वये निविदा मागविल्या असता त्यामध्ये मे.श्री.एंटरप्रायझेस (प्रो.प्रा.श्री.मनोज मारूती खांडेकर) ११ बी.विंग सुदर्शन सोसायटी शांतीनगर नागोठणे ता.रोहा (अंदाजपत्रकीय दराने रक्कम रू.१,४६,२६,७९९/- ने प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे कलम ४(२) नुसार व शासन निर्णय दिनांक -०८ ऑक्टोबर २०२१ नुसार ७५ लेक्ष वरिल निविदा मंजुरीचे अधिकार जिल्हा परिषद सभा यांना आहेत. परंतू दिनांक -२०/०३/२०२२ रोजी जिल्हा परिषदेचा कार्यकाल संपल्याने महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ११/०३/२०२२ व महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचेकडील क्र.झेपीए-२०२२/प्र.क्र.२५/पंरा-१/दिनांक-१४/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषदवर प्रशासक नियुक्ती करण्यात आल्याने ७५ लक्ष वरिल निविदा मंजुरीचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असल्याने प्रा.आ.उपकेंद्र रासळ ता.सुधागड मुख्य इमारत बांधकाम करणे. या कामाच्या निविदेस कमी दराने प्राप्त झालेल्या निविदाधारक मे.श्री.एंटरप्रायझेस (प्रो.प्रा.श्री.मनोज मारूती खांडेकर) ११ बी.विंग सुदर्शन सोसायटी शांतीनगर नागोठणे ता.रोहा यांच्या निविदेस आजच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रा.आ.उपकेंद्र रासळ ता.सुधागड मुख्य इमारत बांधकाम करणेच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- बांधकाम विभाग**

**विषय (०४)०९ :- सन २०२४-२५ चे अर्थ संकल्पातील लेखाशिर्षाखलील शिक्षण विभागाकडील योजनांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) म्हणाल्या की, जिल्हा परिषद सेस पुरवणी अर्थ संकल्पास मान्यता दिल्यानुसार शिक्षण विभागाकरीता सुधारीत तरतुद मंजूर करण्यात आली आहे. त्यानुसार खालील प्रमाणे शिक्षण विभागाकडील योजना प्रशासकीय मान्यता देणे बाबत.

| अ.क्र. | योजनेच नाव | संगणक सांकेतांक | एकुण मंजूर तरतुद |
|---|---|---|---|
| १ | नाविन्यपूर्ण योजना जि.प. शाळांना क्रिडा साहित्य व कवायत साहित्य पुरविणे | ०३९६ | ९०,००,०००/- |
| | लेखाशिर्ष :- जिल्हा परिषद सेस सन २०२४-२५ | | |

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ मध्ये उप विभाग दिनांक ११ मार्च २०२२ नुसार जिल्हा परिषदेचा कार्यकाळ दि.२०.०३.२०२२ रोजी संपुष्टात आल्याने दिनांक २१.०३.२०२२ पासुन प्रशासक म्हणुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग हे आहेत.

महाराष्ट्र शासनाचे ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक झेपीए-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९, दि.०७ ऑक्टोबर २०१७ मधील भाग २ नुसार विकास योजना यांच्या संबंधातील रक्कम रू.५०,००,००१/- ते संपुर्ण रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेस आहेत.

त्यानुसार वरील कामाच्या रक्कमेस आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने प्रशासकीय मान्यता दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून सन २०२४-२५ चे अर्थ

संकल्पातील लेखाशिर्षाखलील शिक्षण विभागाकडील योजनांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- शिक्षण विभाग (प्राथमिक)**

**विषय (०४)१० :- सन २०२४-२५ चे अर्थ संकल्पातील लेखाशिर्षाखलील शिक्षण विभागाकडील योजनांच्या निधीस तांत्रिक मान्यता देणेबाबत.**

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) म्हणाल्या की, जिल्हा परिषद सेस पुरवणी अर्थ संकल्पास मान्यता दिल्यानुसार शिक्षण विभागाकरीता सुधारीत तरतुद मंजूर करण्यात आली आहे. त्यानुसार खालील प्रमाणे शिक्षण विभागाकडील योजना तांत्रिक मान्यता देणे बाबत.

| अ.क्र. | योजनेच नाव | संगणक सांकेतांक | एकुण मंजूर तरतुद |
|---|---|---|---|
| १ | नाविन्यपूर्ण योजना जि.प. शाळांना क्रिडा साहित्य व कवायत साहित्य पुरविणे | ०३९६ | ९०,००,०००/- |
| | लेखाशिर्ष :- जिल्हा परिषद सेस सन २०२४-२५ | | |

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ मध्ये उप विभाग दिनांक ११ मार्च २०२२ नुसार जिल्हा परिषदेचा कार्यकाळ दि.२०.०३.२०२२ रोजी संपुष्टात आल्याने दिनांक २१.०३.२०२२ पासुन प्रशासक म्हणुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग हे आहेत.

महाराष्ट्र शासनाचे ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक झेपीए-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९, दि.०७ ऑक्टोबर २०१७ मधील भाग २ नुसार विकास योजना यांच्या संबंधातील रक्कम रू.५०,००,००१/- ते संपुर्ण रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेस आहेत.

त्यानुसार वरील कामाच्या रक्कमेस आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने तांत्रिक मान्यता दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून सन २०२४-२५ चे अर्थ संकल्पातील लेखाशिर्षाखलील शिक्षण विभागाकडील योजनांच्या निधीस तांत्रिक मान्यता देणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- शिक्षण विभाग (प्राथमिक)**

**विषय (०४)११ :- सन २०२४-२५ करिता सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत- नाविन्यपुर्ण योजना (३४५१-१७७७) या लेखाशिर्षांतर्गत - जिल्हयातील ६ प्राथमिक आरोग्य केंद्रना Portable Health Atm Machine( cloud Based Health Kiosk) खरेदी करून पुरवठा करण्याकरिता ई निविद स्विकृत करून कार्यारंभ देण्यास मंजुरी मिळणेबाबत.**

जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणाले की, जिल्हा नियोजन समिती लेखाशिर्ष ३४५१ १७७७ अंतर्गत निधी वितरण आदेश क्रमांक ०४३३४, दिनांक २०/०९/२०२४ अन्वये सन २०२४-२५ मध्ये जिल्हयातील ६ प्राथमिक आरोग्य संस्थामध्ये Portable Health Atm Machine( cloud Based Health Kiosk) खरेदी करणेकरीता

रक्कम रूपये १००.०० लक्ष इतका निधी मंजुर करण्यात आलेला आहे. सदर योजनेस तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने जिल्हयातील ६ प्राथमिक आरोग्य संस्थामध्ये Portable Health Atm Machine( cloud Based Health Kiosk) मधील खरेदी करून पुरवठा करणेकरिता GEM Portal वर निविदा प्रसिध्द केलेल्या निविदेमध्ये तीन निविद ाधारकाचा आर्थिक लिफाफा उघडला असता, M/s Healthnovo Digilife Private Limited यांचे न्युनतम दर सर्व करासहित प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार संबंधित निविदाधारकास पुरवठा आदेश देणेसाठी. खालीलप्रमाणे प्रस्ताव सर्व साधारण सभेपुढे सादर करणेत येत आहे.

| Name of Medicine/Material/Instrument | Packing items | Rate (Inclusive All Taxes) | Requirment QTY | Amount |
|---|---|---|---|---|
| Portable Health Atm Machine ( cloud Based Health Kiosk) | १ Nos | १४७५०००/- | ६ Nos | ८८,५०,०००/- |

जिल्हयातील ६ प्राथमिक आरोग्य संस्थामध्ये Portable Health Atm Machine( cloud Based Health Kiosk) मशीन खरेदी करून पुरवठा करणेकरीता ई निविदा प्रसिध्द केलेल्या निविदेमध्ये तीन निविदाधारकाचा आर्थिक लिफ ाफ ा उघडला असता, M/s Healthnovo Digilife Private Limited यांचे न्युनतम दर सर्व करासहीत प्राप्त झालेले आहेत. सदर प्रस्तावास ग्रामविकास विभागाकडील शासन राजपत्र दि.११ मार्च २०२२ व १३ संप्टेबर २०२२ अन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासक म्हणुन नियुक्त केले आहे. त्यानुसार M/s Healthnovo Digilife Private Limited यांना पुरवठा आदेश देणेकरीता महारष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च केलम १३७ नुसार मंजुरीचे अधिकार जिल्हा परिषदेच्या सर्वसाधाण सभेस असल्याने आजच्या सभेने मान्यता दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून सन २०२४-२५ करिता सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत- नाविन्यपुर्ण योजना (३४५१-१७७७) या लेखाशिर्षांतर्गत - जिल्हयातील ६ प्राथमिक आरोग्य केंद्रना Portable Health Atm Machine( cloud Based Health Kiosk) खरेदी करून पुरवठा करण्याकरिता ई निविद स्विकृत करून कार्यारंभ देण्यास मंजुरी मिळणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- आरोग्य विभाग**

**विषय (०४)१२ :- रेवदंडा ते सालाव पुला पर्यंत रस्ता व नामफलक कमाण तयार करणे.**

कार्यकारी अभियंता (बांधकाम) म्हणाले की, रेवदंडा ते सालाव पुला पर्यंत रस्ता व नामफलक कमाण तयार करणे. ता.अलिबाग या कामास मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण बाहय रस्ते विकास योजना या लेखाशिर्षातर्गत जा.क्र.राजिप/बांखा/प्रशा३/१३४५०/२०२४ दि.२३.०९.२०२४ अन्वये रक्कम रू.२,४०,००,०००/- प्रशासकीय मंजुरी देणेत आलेली आहे.

बांधकाम विभाग रायगड जिल्हा परिषद अलिबाग कार्यालयाकडून दिनांक २७/०९/२०२४ अन्वये निविदा मागविल्या असता त्यामध्ये मे.रचना कंन्स्ट्रक्शन प्रो.प्रा.सुशिल सुंदरदास बजाज मु.पो.उल्हासनगर जि.ठाणे. (०.०१% कमी दराने रक्कम रू.२,३१,७१,००२/-) ने प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे कलम ४(२) नुसार व शासन निर्णय दिनांक -०८ ऑक्टोबर २०२१ नुसार ७५ लेक्ष वरिल निविदा मंजुरीचे अधिकार जिल्हा परिषद सभा यांना आहेत. परंतू दिनांक -२०/०३/२०२२ रोजी जिल्हा परिषदेचा कार्यकाल संपल्याने महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ११/०३/२०२२ व महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचेकडील क्र.झेपीए-२०२२/प्र.क्र.२५/पंरा-१/दिनांक-१४/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषदवर प्रशासक नियुक्ती करण्यात आल्याने ७५ लक्ष वरिल निविदा मंजुरीचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असल्याने रेवदंडा ते सालाव पुला पर्यंत रस्ता व नामफलक कमाण तयार करणे. ता.अलिबाग या कामाच्या निविदेस कमी दराने प्राप्त झालेल्या निविदाधारक मे.रचना कंन्स्ट्रक्शन प्रो.प्रा.सुशिल सुंदरदास बजाज मु.पो.उल्हासनगर जि.ठाणे यांच्या निविदेस आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मान्यता दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून रेवदंडा ते सालाव पुला पर्यंत रस्ता व नामफलक कमाण तयार करणे. ता.अलिबाग या कामाच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- बांधकाम विभाग**

**विषय (०४)१३ :- अलिबाग ते रेवदंडा थेरोंडे फाटा पर्यंत रस्ता व नामकरण कमाण तयार करणे. ता अलिबाग**

कार्यकारी अभियंता (बांधकाम) म्हणाले की, अलिबाग ते रेवदंडा थेरोंडे फाटा पर्यंत रस्ता व नामकरण कमाण तयार करणे. ता.अलिबाग या कामास मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण बाहय रस्ते विकास योजना या लेखाशिर्षातर्गत जा.क्र.रा.जि.प./बांखा/प्रशा.३/१३४५०/२०२४ दि.२३.०९.२०२४ अन्वये रक्कम रू.२,६०,००,०००/- प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली आहे.

बांधकाम विभाग रायगड जिल्हा परिषद अलिबाग कार्यालयाकडून दिनांक २७/०९/२०२४ अन्वये निविदा मागविल्या असता त्यामध्ये मे.रचना कंन्स्ट्रक्शन प्रो.प्रा.सुशिल सुंदरदास बजाज मु.पो.उल्हासनगर जि.ठाणे. (०.०१% कमी दराने रक्कम रू.२,४१,३८,८२७/-) ने प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे कलम ४(२) नुसार व शासन निर्णय दिनांक -०८ ऑक्टोबर २०२१ नुसार ७५ लेक्ष वरिल निविदा मंजुरीचे अधिकार जिल्हा परिषद सभा यांना आहेत. परंतू दिनांक -२०/०३/२०२२ रोजी जिल्हा परिषदेचा कार्यकाल संपल्याने महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ११/०३/२०२२ व महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचेकडील क्र.झेपीए-२०२२/प्र.क्र.२५/पंरा-१/दिनांक-१४/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषदवर प्रशासक नियुक्ती करण्यात आल्याने ७५ लक्ष वरिल निविदा मंजुरीचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असल्याने अलिबाग ते रेवदंडा थेरोंडे फाटा पर्यंत रस्ता व नामकरण कमाण तयार करणे. ता.अलिबाग या कामाच्या निविदेस कमी दराने प्राप्त झालेल्या निविदाधारक मे.रचना कंन्स्ट्रक्शन प्रो.प्रा.सुशिल सुंदरदास बजाज मु.पो.उल्हासनगर जि.ठाणे यांच्या निविदेस आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मान्यता दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून अलिबाग ते रेवदंडा थेरोंडे फाटा पर्यंत रस्ता व नामकरण कमाण तयार करणे. ता.अलिबाग या कामाच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- बांधकाम विभाग**

**विषय (०४)१४ :- ग्रा.मा.३४ ते नंबरवाडी रसत सुधारणा करणे कि.मी. ००/०० ते १/५०० ता.सुधागड**

कार्यकारी अभियंता (बांधकाम) म्हणाले की, ग्रा.मा.३४ ते नंबरवाडी रस्ता सुधारणा करणे कि.मी.००/०० ते १/५०० ता.सुधागड या कामास आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत रस्ते व दरूस्ती/सुधारणा या लेखाशिर्षातर्गत रक्कम रू.२,००,००,०००/- प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली आहे.

बांधकाम विभाग रायगड जिल्हा परिषद अलिबाग कार्यालयाकडून दिनांक २४/०९/२०२४ अन्वये निविदा मागविल्या असता त्यामध्ये मे रामेश्वर कन्स्ट्रक्शन (प्रो.प्रा.श्री.राजू स्त्यनारायण पिचिका), शॉप नं.४७, पहिला मजला, शरद पवार भवन मु.पो.ता.पेण, जि.रायगड (अंदाजपत्रकीय दराने रक्कम रू.१,९३,७५,५८८/-) ने प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे कलम ४(२) नुसार व शासन निर्णय दिनांक -०८ ऑक्टोबर २०२१ नुसार ७५ लेक्ष वरिल निविदा मंजुरीचे अधिकार जिल्हा परिषद सभा यांना आहेत. सदरचा प्रस्ताव बांधकाम समिती सभा दि.२४.१२.२०२४ ठराव क्रमांक २८ अन्वये मंजुर करण्यात आला आहे. परंतु जिल्हा परिषदेमध्ये प्रशासकीय कालावधी असल्याने सदरचे अधिकार महाराष्ट्र शासन राजपत्र ग्राम विकास विभाग दिनांक ११/०३/२०२२ अन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले असल्याने ग्रा.मा.३४ ते नंबरवाडी रस्ता सुधारणा करणे कि.मी. ००/०० ते १/५०० ता.सुधागड या कामाच्या निविदेस कमी दराने प्राप्त झालेल्या निविदाधारक मे.रामेश्वर कन्स्ट्रक्शन (प्रो.प्रा.श्री.राजू सत्यनारायण पिचिका) शॉप नं.४७, पहिला मजला, शरद पवार भवन, मु.पो.ता.पेण, जि.रायगड (अंदाजपत्रक दराने रक्कम रू. १,९३,७५,५८८/-) यांच्या कामाची निविदा आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मान्यता दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ग्रा.मा.३४ ते नंबरवाडी रस्ता सुधारणा करणे कि.मी.००/०० ते १/५०० ता.सुधागड या कामाच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- बांधकाम विभाग**

**विषय (०४)१५ :- जिल्हा परिषद, रायगड (जि.रायगड) अलिबाग येथे प्रशासकीय इमारींचे बांधकाम करणे ई-निविदा प्रसिध्द करणेसाठी मंजूरी मिळणेबाबत.**

कार्यकारी अभियंता (बांधकाम) म्हणाले की, रायगड जिल्हा परिषदेची मुळ प्रशासकीय इमारत बांधकाम सन १९८३ वर्षात झालेली असूनया इमारतीस ४० वर्षे झालेली आहेत. सदर इमारत ही समुद्र किनाऱ्यालगत असल्याने व इमारतीमध्ये पावसाच्या पाण्यामुळे होणारी गळती व भिंती/छताची वारंवार दुरूस्ती करावी लागत होती. त्यानुसार इमारतीचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर विदयापिठ लोणेरे ता.माणगांव, जि.रायगड यांचे कार्यालयाकडील नं.डिओसीइ/एसए/राजिप-प्रइ/०३बी/ दि.३०.०६.२०२३ अन्वये प्राप्त स्क्ट्रक्चरल ऑडिट अहवालानुसार इमारत बांधकाम धोकादायक असल्याचे निदर्शनास आलेले आहे. रायगड जिल्हा परिषद, नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाचे रचना व आराखडा डॉ.बाबासाहेब आंबेडकर विदयापिठ लोणेरे ता.माणगांव जि.रायगड यांचे कार्यालयाकडून, तयार करण्यात आला. नविन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव, मान्यता व निधी उपलब्धतेसाठी ग्रामविकास विभागा कार्यालयास बांधकाम विभाग जाक्र/ राजिप/ बांखा/ रेखाचित्रशाखा/ जिल्हा परिषद इमारत/१७५१/२०२४ दि.०६ फेब्रुवारी २०२४ अन्वये सादर करण्यात आला. त्यानुसार संदर्भान्वये मा.उच्चधिकारी समितीचे दि.०६ जुलै २०२४ रोजीच्या बैठकीनुसार महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक-जिपई-२०२३/प्र.क्र.२१२/बांध-४/बांधकाम भवन, मंत्रालय मुंबई / दिनांक २६ ऑगस्ट-२०२४ अन्वये जिल्हा परिषद (जि.रायगड) येथील नवीन प्रशासकीय

इमारतीच्या बांधकामास रूपये ७७,८३,८१,०००/- (रूपये सत्याहत्तर कोटी त्र्याऐंशी लक्ष ऐक्याऐंशी हजार फक्त) इतक्या अंदाजपत्रकास रक्कम रूपये ६३,६०,२७,८५४/- (रूपये त्रेसष्ठ कोटी साठ लक्ष सत्यावीस हजार आठशे चौपन्न फक्त) इतक्या रक्कमेस तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकाप्रमाणे खर्च भाग (अ) कामाचा भाग, भाग (ब) चाचणी + रॉयल्टी |
|---|---|---|
| १. | जिल्हा परिषद, रायगड (जि.रायगड) अलिबाग येथे प्रशासकीय इमारतींचे बांधकाम करणे. | ५२,८९,२१,२९९/- |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६८ चे कलम ४(२) नुसार तसेच महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्र.झेडपीए-२०१६/प्रक्रं.१६/वित्त-९/ दिनांक ८ ऑक्टोबर-२०२१ अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समिती मधील बांधकामे/विकास योजना यांच्याशी संबंधित प्रशासकीय व तांत्रिक मान्यता आणि निविदा कंत्राट स्विकारण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे. परंतू जिल्हा परिषदेमध्ये प्रशासकीय कालावधी असल्याने सदरचे अधिकार, महाराष्ट्र शासन राजपत्र ग्राम विकास विभाग यांचेकडील दिनांक ११/०३/२०२२ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान केलेले आहेत. उपरोक्त प्रस्तावित कामाचे ई-निविदा प्रसिध्द करणेच्या प्रस्तावास आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मान्यता दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून जिल्हा परिषद, रायगड (जि.रायगड) अलिबाग येथे प्रशासकीय इमारींचे बांधकाम करणे ई-निविदा प्रसिध्द करणेसाठी मंजूरी मिळणेबाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- बांधकाम विभाग**

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाले की, आजच्या सभेत देणेंत आलेल्या सुचना प्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करावी व पुर्तता त्वरीत करणेंत यावी. तरी आजची सभा चांगल्या पध्दतीने पार पडली. तरी मी सर्वाचे आभार मानतो व आजची सभा संपल्याचे जाहिर करतो.

**(जालिंदर पठारे)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)**
